# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक                                        ता. ३० ऑक्टोबर २०१९**</u>

# दक्षता जनजागृती सप्ताहांतर्गत ३१ ला मोटरसायकल रॅली

**नागपूर, ता. ३० :** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत गुरुवारी (ता. ३१) मोटरसायकल रॅलीचे आयोजन दुपारी ३ वाजता भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल चौकातून करण्यात आले आहे.

सदर रॅली रेल्वे अंडर ब्रीज, काँग्रेस नगर, रहाटे कॉलनी, लोकमत चौक, पंचशील चौक, झाशी राणी चौक, व्हेरायटी चौक, झिरो माईल चौक असे मार्गक्रमण करीत दुपारी ४ वाजता संविधान चौक येथे पोहोचेल. तेथे रॅलीचा समारोप होईल, अशी माहिती मनपा उपायुक्त निर्भय जैन यांनी पत्रकाद्वारे दिली.